महाराष्ट्र शासन

क्रमांक: शाशिम-१०९३/व/प्र.क्र. १०८/क्रीयुसे-३
समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.

दिनांक २३ जूलै, १९९३

प्रति,

कुलसचिव,
अमरावती विद्यापीठ, अमरावती

विषय :- सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षापासून बी. पी. एड. अभ्यासक्रम सुरु करण्याची परवानगी देणेबाबत,

महोदय,

सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षापासून नवीन शारिरीक शिक्षण महाविद्यालय सुरु करण्याकरीता शासनाकडे प्राप्त झालेल्या व विद्यापीठाकडून शिफारस होऊन प्राप्त झालेल्या सर्व अर्जांचा एकत्रित विचार करुन अमरावती विद्यापीठ अधिनियम १९८३ च्या कलम ५१[४ए][सी][२] अन्वये सन १९९३-९४ पासून खाली दर्शविलेल्या संस्थांना नवीन शारिरीक शिक्षण महाविद्यालय सुरु करण्याकरीता व सदर अधिनियमांच्या कलम ५१[५] च्या अनुषंगाने विद्यापीठाकडे प्राप्त झालेल्या अर्जावर पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्याची विद्यापीठास परवानगी देण्याचे शासनाने ठरविले आहे.

| अनु.क्र. | प्रस्तावित शारिरीक शिक्षण महाविद्यालयाचे नांव | शारिरीक शिक्षण महाविद्यालयाचे ठिकाण |
|---|---|---|
| १] | मागासवर्गीय लोकहित शिक्षण प्रसारक मंडळ, पुसद | यवतमाळ |
| २] | सरदार पटेल विद्यामंदीर, यवतमाळ चे डाह्याभाई पटेल शारिरीक शिक्षण महाविद्यालय, यवतमाळ | यवतमाळ |
| ३] | मोतीराम ठाकरे शिक्षण प्रसारक मंडळ, कासोळा ता. मंगरूळपीर, जि. अकोला. | मंगरूळपीर, अकोला |

२. उपरोक्त संस्थांना सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षापासून कायम विना अनुदान तत्वावर बी. पी. एड. अभ्यासक्रम सुरु करण्याची पुढील अटी व शर्तींच्या अधिन राहून परवानगी देण्यात येत आहे.

१] या सर्व संस्थांना बी. पी. एड. अभ्यासक्रमाकरीता किमान ५० व कमाल १०० एवढी विद्यार्थी प्रवेश क्षमता राहील.

२] सर्व संस्थांनी शारिरीक शिक्षण महाविद्यालय सुरु करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व सोयी/सुविधांची ( Infrastructure / facilities)

उपलब्धता अत्यंत तातडीने करावी. व त्याबाबत संचालक/ उप संचालक, क्रीडा व युवक सेवा यांना समाधानकारक असल्याची खातरजमा केल्यानंतरच विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा.

३. प्रत्येक संस्थेने संचालक, क्रीडा व युवक सेवा, हे सुचवतील त्याप्रमाणे किमान दोन खेळांवर लक्ष केंद्रीत करुन दर्जेदार खेळाडू निर्माण करण्याच्या योजना अंमलात आणणे बंधनकारक राहील.

विद्यार्थी संख्याची अट, आवश्यक सोयी/सुविधांची समाधानकारक-रित्या तातकाळ पूर्तता, दर्जेदार खेळाडूंची निर्मिती आणि इतर कोणत्याही अटी व शर्तींचे पालन न केल्यास त्या संस्थेची शारिरीक शिक्षण महाविद्यालयाची मान्यता कोणतीही पूर्वसूचना न देता कोणत्याही क्षणी काढून घेण्यात येईल.

३. अमरावती विद्यापीठ अधिनियम, १९८३ च्या कलम ५१[६] अन्वये अंतिम संलग्नीकरणाचा प्रस्ताव विद्यापीठाकडून प्राप्त झाल्यावर अमरावती विद्यापीठ अधिनियमांच्या कलम ५१[७] अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार संस्थेचीएकूण कार्यपध्दती व प्रगती समाधानकारक असल्याची खात्री झाल्या-नंतरच त्या संस्थाचे अंतिम मंजूरीचे आदेश शासन निर्णय निर्गमित करण्यात येतील.

आपला विश्वासू

[ म. स. देववी ]

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत

सचिव, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२

संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

अध्यक्ष/सचिव, मागासवर्गीय लोकहितशिक्षण प्रसारक मंडळ, पुसद, जि. यवतमाळ

अध्यक्ष/सचिव, सरदार पटेल विद्यामंदीर, यवतमाळ

अध्यक्ष/सचिव, मोतीराज ठाकरे शिक्षण प्रसारक मंडळ, कासोळा, मंगरुळपीर, अकोला.

निवड नस्ती, क्रीयुसे-३

**महाराष्ट्र शासन**

**सक्षम प्राधिकारी तथा उप सचिव**

**अल्पसंख्याक विकास विभाग**

**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

४७०

**क्रमांक:- अशैसं-२०१६/प्र.क्र.२८५/का-५,** **दिनांक :- ०७.१०.२०१६**

## <u>अल्पसंख्याक दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र</u>

**मागासवर्गीय लोकहित शिक्षण प्रसारक मंडळ, लोकहित विद्यालय परिसर, पुसद, ता. पुसद, जि. यवतमाळ -४४५ २०४** या शैक्षणिक संस्थेने त्यांच्या संस्थेस **धार्मिक ( बौध्द )** अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी दि.०८.०८.२०१६ रोजी अर्ज सादर केला होता. दि. ०७.१०.२०१६ रोजी माझ्या सक्षम संबंधित संस्थेसोबत झालेल्या सुनावणी दरम्यान संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या सादरी करणाच्या आधारे सदर संस्था ही अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्रमांक: अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/का-५, दिनांक २७.०५.२०१३ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकषांतर्गत राज्य शासनाने घोषित केलेल्या संस्थेस **धार्मिक ( बौध्द )** अल्पसंख्याकामधील व्यक्तीकडून अथवा व्यक्तींच्या समुदायाकडून स्थापित व संचलित करण्यात येत असल्याबाबत माझे समाधान झाले आहे. परिणामत: सदर संस्था ही भारतीय संविधानाच्या कलम ३० अन्वये अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था असल्याचे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

हे प्रमाणपत्र केवळ महाराष्ट्र राज्यापुरते लागू असेल. सदर संस्थेस प्रदान करण्यात आलेला संस्थेस **धार्मिक ( बौध्द )** अल्पसंख्याक दर्जा हा संस्था संचलित करत असलेल्या सर्व शैक्षणिक शाखांना लागू राहील.

उपरोल्लेखित शैक्षणिक संस्थेस याद्वारे प्रदान करण्यात आलेला संस्थेस **धार्मिक ( बौध्द )** अल्पसंख्याक दर्जा हा शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून विधिग्राह्य असेल. संबंधित संस्थेने अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्रमांक: अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/का-५, दि.२७.०५.२०१३ अन्वये विहीत करण्यात आलेल्या निकष व अटींची सातत्याने व विनिर्देशपूर्वक पूर्तता करणे बंधनकारक राहील.

अल्पसंख्याक विकास विभाग
महाराष्ट्र शासन

7/X/2016

(सं. छ. तडवी)

**सक्षम प्राधिकारी तथा उप सचिव**

**अल्पसंख्याक विकास विभाग,महाराष्ट्र शासन**

**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

महाराष्ट्र शासन

**SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE**

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART – TWO

**गुरुवार, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१७**

**अधिसुचना**

**विषय क्र. १५०/२०१७** **दिनांक : ३०/११/२०१७**

**विषय :- अल्पसंख्यांक दर्जाबाबत...**

सर्व सामान्यांच्या माहिती करिता अधिसुचीत करण्यात येते की, सक्षम प्रधिकारी अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी प्रदान केलेल्या अल्पसंख्यांक दर्ज्याच्या मान्यतेच्या प्रमाण पत्रानुसार खालील संस्थेद्वारा संचालित महाविद्यालयांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अल्पसंख्यांक दर्जा देण्यासंदर्भातील विषयाची विद्या परिषदेने नोंद घेतलेली आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | महाविद्यालयाचे नाव | अल्पसंख्याक दर्जा प्रकार धार्मिक | / भाषिक | अल्पसंख्याक दर्जा दिलेल्या आदेशाचा क्रमांक व दिनांक | विद्या परिषद |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मागासवर्गीय लोकहित शिक्षण प्रसारक मंडळ, पुसद, जिल्हा-यवतमाळ. | लोकहित कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन, यवतमाळ | बौध्द | -- | सक्षम प्राधिकारी तथा उपसचिव अल्पसंख्यांक विकासविभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे प्रमाणपत्र क्रमांक अशैसं-२०१६/ प्र.क्र. २८५/का-५, दिनांक ७/१०/२०१६ | दिनांक ०६.६.२०१७ रोजी झालेल्या विद्वत परिषदेने बाब क्रमांक ३५ नुसार सदर विषयाची नोंद घेतलेली आहे. (शैक्षणिक सत्र २०१६-१७ पासुन) |
| २ | मजलिसे-मदरसा-ए-सैफिया संस्था, सैफी मार्ग, बोहरा मस्जिद, अमरावती. | वाहेद खान विज्ञान महाविद्यालय, अमरावती | मुस्लिम | उर्दू | सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे प्रमाणपत्र क्रमांक अशैसं-२००९/६६८/प्र.क्र ३९/२००९/का-१, दिनांक २४/०४/०९. | दिनांक ०६.६.२०१७ रोजी झालेल्या विद्वत परिषदेने बाब क्रमांक ६० नुसार सदर विषयाची नोंद घेतलेली आहे.(शैक्षणिक सत्र २०१६-१७ पासून) |
| ३ | सकिना एज्युकेशन सोसायटी, रिझवी ले-आऊट, चपराशीपूर, कॅम्प, अमरावती. | राष्ट्रीय अल्पसंख्याक महिला महाविद्यालय, अमरावती | मुस्लिम | उर्दू | सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव अल्पसंख्यांक विकास विभाग,महाराष्ट्रशासन, मंत्रालय, मुंबई यांचे प्रमाणपत्र क्रमांक अशैसं-२००९/११२८/ प्र. क्र. ३९ /२००९/का-१ दि.३०/११/२००९. | दिनांक ०६.६.२०१७ रोजी झालेल्या विद्वत परिषदेने बाब क्रमांक ६० नुसार सदर विषयाची नोंद घेतलेली आहे.(शैक्षणिक सत्र २०१६-१७ पासून) |
| ४ | सारडा एज्युकेशन सोसायटी (ट्रस्ट), अंजनगाव सुर्जी, जिल्हा-अमरावती. | श्रीमती राधाबाई सारडा कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगांव सुर्जी. जिल्हा-अमरावती. | — | मारवाडी | सक्षम प्राधिकारी तथा सहसचिव अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे प्रमाणपत्र क्रमांक अशैसं-२०१७/ प्र. क्र. १५२/का-५, दि.२८/८/२०१७ | सदर विषयाची नोंद घेण्याकरीता मा. कुलगुरुंनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा २०१६ मधील तरतुद क्रमांक १२ (७) अंतर्गत विद्यापरिषदेच्या वतीने कार्यवाही केलेली आहे.(शैक्षणिक सत्र २०१७-१८पासून) |
| ५ | स्व.करीमा बहुउद्देशिय सोशल वेलफअर सोसायटी, लोणार, जिल्हा - बुलडाणा | डॉ.जाकीर हुसेन हिंदी /उर्दु कला महाविद्यालय, लोणार, जिल्हा-बुलडाणा | मुस्लिम | उर्दू | सक्षम प्राधिकारी तथा अप्पर मुख्य सचिव अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे प्रमाणपत्र क्र. अशैसं-२०१०/प्र. क्र. १००/२०१०/का-५, दि.०६/०१/२०१२ | सदर विषयाची नोंद घेण्याकरीता मा. कुलगुरुंनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा २०१६ मधील तरतुद क्रमांक १२ (७) अंतर्गत विद्यापरिषदेच्या वतीने कार्यवाही केलेली आहे.(शैक्षणिक सत्र २०१७-१८पासून) |

स्वा/-

कुलसचिव,

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ